स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

–: विषय :–

‘‘नागनाथ पाटील यांचे समग्र साहित्य : एक विवेचक अभ्यास‘‘

–: संशोधक :–

बंडले सुरेखा तुळशीराम

एम.ए.एम.एड. नेट(मराठी)

–: मार्गदर्शक :–

डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे

प्रमुख, मराठी विभाग

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

जि.नांदेड

–: संशोधन केंद्र :–

देगलूर महाविद्यालय, देगलूर

जून – २०१९

मराठवाड्यातील ग्रामीण लेखक : नागनाथ पाटील - एक विवेचक अभ्यास

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले	-	मराठवाड्यातील ग्रामीण लेखकांची पूर्वपिठीका
प्रकरण दुसरे	-	नागनाथ पाटील - व्यक्ती आणि वांङ्मय
प्रकरण तिसरे	-	नागनाथ पाटील यांच्या कथेचा अभ्यास
प्रकरण चौथे	-	नागनाथ पाटील यांची कादंबरीचा अभ्यास
प्रकरण पाचवे	-	नागनाथ पाटील यांचे कवितासंग्रह आणि संपादन यांचा अभ्यास
प्रकरण सहावे	-	मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यात नागनाथ पाटील यांचे योगदान
प्रकरण सातवे	-	समग्र साहित्याचे वांङ्मयीन मूल्यमापन निष्कर्षात्मक समारोप

प्रास्ताविक :-

१९२० नंतर ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला. भारत हा कृषीप्रधान देश खरा, पण ग्रामीणतेची विशिष्ट जाणीव जागृती झाली ती मुख्यत: गांधीयुगात गांधी युगोत्तर काळात विशिष्ट राजकीय, सामाजिक सांस्कृतिक, परिस्थितीमुळे ही जाणीव वाढीस लागली. ग्रामीण परिसरावर आधारलेले साहित्य हळुहळु उदयास येऊ लागले. १९२० नंतर मराठी मध्ये वेगवेगळ्या वांङ्मयप्रकारामधून ग्रामीण जीवन चित्रणाला प्रारंभ झाला. कविता, कथा, कादंबरी या वांङ्मयप्रकारांमधून ग्रामीण जीवन प्रकट व्हायला लागले. हे ग्रामीण साहित्य आजही विविध अंगानी विकसीत होत आहे. ग.ल.ठोकळ, र.वा.दिघे, श्री.म.माटे, व्यंकटेश माडयूळकर, शंकर पाटील, रा.रं.बोराडे, विश्वास पाटील, ना.धो.महानोर, भास्कर चंदनशिव अशी एक सलग परंपरा निर्देशित करता येते.

मराठी साहित्यात साठोत्तरी प्रवाह सुरु झाल्यानंतर मात्र अने साहित्यीकांनी वेगवेगळ्या साहित्यकृतीचे लेखन केले. त्यातून त्यांनी शहरी आणि ग्रामीण समाज जीवनाचे महत्त्वपूर्ण बदल मांडण्याचा प्रयत्न केला. जागतिकीकरणामूळे ग्रामीण जीवनाची जी भयानक   झाली. त्याचे वर्णन ग्रामीण साहित्यात दिसून येते.

महाराष्ट्रातील अविकसीत भाग म्हणून मराठवाड्याचा नेहमीच उल्लेख केला जातो. मराठवाडा हा मागासलेला प्रादेशिक विभाग आहे. सर्वच क्षेत्रात हे मागासलेपण दिसून येते. मराठवाड्यातील उदयाला आलेल्या लेखकाच्या पिढीला आत्मभान होते. मराठवाड्यातील ग्रामीण जीवन, शेती, शेतकरी, नापिके, कर्जबाजारीपणा, दारिद्रय व भूककंगात्यपणा याचे जणू शाप भोगत शेतकरी गळफास लावून घेतो. हे सर्व वास्तव चित्रण येथील साहित्यातून प्रकट झालेले दिसून येतो.

कोणतेही साहित्य हा त्या विभागातील समानमनाचा आरसा असतो. त्यामूळे समाजात घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांचे आणि त्या संदर्भात निर्माण होणाऱ्या समाजमनावरील प्रतिकृीयांचे चित्रण साहित्यात केले जाते. म्हणूनच मराठवाड्यातील लेखकांच्या साहित्यातून येणारे मनोविश्लेषण अधिक सूक्ष्म आणि समाजाचे भान प्रकट करणारे आहे. म्हणजे बदलत्या ग्रामीण जीवनात ग्रामीण माणसाच्या मनाची होणारी उधालाल त्यावर परिस्थितीचे होणारे घात, प्रत्यघात त्याचे धुमसणे, गुदमरणे आणि भाव भावनांच्या मध्ये गुंतत जाणे हे सर्व चित्रण ह्या साहित्यात प्रकट होते. त्यात प्रामुख्याने य.रं.बोराडे, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, आ.धो.महानरे, इंद्रजीत भालेराव, नागनाथ पाटील अशा अनेक साहित्यीकांनी या मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे.

नागनाथ पाटील हे असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्व असलेले एक जिज्ञासू लेखक, कवी, कथाकार, कादंबरीकार आणि नाटककार आहेत. त्यांनी आपल्या साहित्यामधून ग्रामीण समाजातील सर्व स्तरांच्या माणसांच्या व्यथा वेदनांचे वास्तव चित्रण रेखाटले आहे. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण माणूस, त्याची जिद्द, चिकाटी, जीवनातील संघर्ष, अंधश्रध्दा, रुढी परंपरा, वैयक्तिक आणि सामाजिक प्रश्न,

बलुतेदारी जगण्यासाठीचा संघर्ष यांचे चित्रण त्यांनी साहित्यातून व्यक्त केले.

कुठल्याही साहित्यकृतीमागे ज्याप्रमाणे लेखक उभा असतो. त्याप्रमाणे त्या साहित्यामागे आणि लेखकामागे ही एक स्वतंत्र असे अनुभवालेख असते. त्यात मग प्रदेश, त्या प्रदेशातले जीवन, तिथल्या प्रथा, तिथले समाजजीवन, तिथल्या लोकांच्या समस्या हे साहित्यातून आपसूकच अनुभवाला येतात. नागनाथ पाटील यांच्या साहित्यातून अशाच बदलत्या ग्रामजीवनाचे विख, त्यामुळे बदलेले समाजजीवन, परंपरा, धर्मभोळेपणा, अरमानी, सुल्तानी, संकटात अडकलेला शेतकरी त्यामुळे त्यांचे विस्फटून गेलेले जीवन तसेच सामाजिक, राजकीय, आधुनिक आणि जागतिकीकरणाचे युग तीव्र पडसाद त्यांच्या साहित्यातून उमटलेले दिसतात.

एकूणच मराठवाड्यातील साहित्यविखान अशा वास्तव अनुभवविखाचे चित्रण करणाऱ्या नागनाथ पाटील यांच्या साहित्याने मराठवाड्यातील ग्रामीण साहित्य महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

मराठवाड्यातील नागनाथ पाटील या लेखकांच्या साहित्या आधारे शेती, शेतकरी त्यांच्या जीवनाची वैशिष्ट्ये येथे लक्षात घ्यावयाची आहेत.

ग्रहितके

प्रस्तुत विषयावर संशोधन करत असताना खालील ग्रहितके निश्चीत करण्यात आली आहेत.

०१. नागनाथ पाटील यांच्या साहित्यातून ग्रामीण जीवनातील विविध अनुभवांचे चित्रण केले आहे.

०२. ना.पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक पणे अभ्यास केले आहे.

०३. जागतिकीकरणाचा गंभीर परिणाम नागनाथ पाटील यांच्या साहित्यावर झालेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व

मराठवाडा हा देखील एक प्रादेशीक विभाग आहे. या विभागातील अनेक लेखकांनी ग्रामीण जिवनाचे चित्रण करणाऱ्या लेखकांनी बाह्य वास्तवबरोबरच तेथील माणसांचे अंर्तवास्वतवही शोधण्याचा प्रयत्न केला. नागनाथ पाटील हे असेच लेख आहेत. त्यांनी सुध्दा ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण साहित्यात आणले. नागनाथ पाटील यांच्या साहित्याच्या माध्यमातून ग्रामीण संकल्पनेचा शोध घेण्यासाठी, स्थळ, काळ आणि वास्तव कथानक पात्र आणि निवेदन या घटकांचा अभ्यास अनिवार्य होता म्हणून हा शोध घेणे आवश्यक होते.

उद्दिष्टे

मराठवाड्यातील ग्रामीण लेखक : नागनाथ पाटील : एक विवेचक अभ्यास या विषयावर संशोधन करण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. नागनाथ पाटील यांच्या ग्रामीण साहित्याचे स्वरुप जाणून घेणे.

२. मराठवाड्यातील ग्रामीण साहित्याच्या अनुषंगाने नागनाथ पाटील यांच्या समग्र साहित्याच्या अभ्यास करणे.

३. मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यातील नागनाथ पाटील यांच्या साहित्यातील भौगोलीक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परंपरेचा शोध घेणे.

४. नागनाथ पाटील यांच्या साहित्यातील समाजजीवनाच्या व्यथा, वेदना, रुढी-परंपरा यांचा शोध घेणे व समाजजीवनावर झालेल्या परिणामांचा शोध घेणे.

५. आधुनिकीकरणाचा तत्कालीन समाजावर झालेल्या परिणामाचा शोध घेणे.

६. नागनाथ पाटील यांच्या साहित्याचे वांङ्मयीन मूल्यमापन करणे.

संशोधन निवडीमागील भूमिका :

सध्याच्या औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणाच्या युगात ग्रामीण जीवन हे मरगळल्यासारखे झाले आहे. ही परिस्थीती बदलण्यासाठी ग्रामीण भागात आमुलाग्र असा बदल झाला पाहिजे. त्यासाठी साहित्य हा प्रभावी माध्यम आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना अभ्यास पत्रिकामधून वेगवेगळ्या वाङमयप्रवाहांची ओळख झाली. ग्रामीण साहित्य हा त्यातीलच एक महत्वाचा व प्रतिष्ठाप्राप्त वांङ्मयप्रवाह याची प्रारंभापासून मला आवड होती. अभ्यासक्रमांच्या व्यतिरीक्त इतरही काही पुस्तके वाचण्याची संधी मला मिळाली. त्यात पाचोळा, गोतावळा, बारोमास, गावगाडा, इ. साहित्यकृतीची माझ्या मनावर भुरळ घातली. यामधील असलेले ग्रामीण वास्तव आपलेसे वाटू लागले. नागनाथ पाटील यांच्या साहित्याशी परिचय झाला. त्यांचे कोंडणातील जीण ही कादंबरी वाचल्यानंतर त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले चित्रण हे मला अतिशय जवळचे वाटू लागले. ग्रामीण भागात जीवन जगणारा समाज, तेथील लोकांचे दुःख बदलत्या जीवनमानानुसार त्यांचे बदलणारे प्रश्न आणि समस्या त्याविषयी त्यांना वाटणारी तळमळ आणि त्यातून व्यक्त होणारा वैयक्तिक, सामुहिक अविष्कार ह्याविषयी मला आस्था वाटू लागली.

मराठवाड्यात अनेक मराठी साहित्यीकांनी आपल्या सर्जनशील लेखणीने साहित्यामधून ग्रामीण समाजव्यवस्थेचे मूलभूत स्वरुपात अनेक प्रश्नांचे वास्तवचित्रण केलेले आहे. व्यक्ती आणि समाज यांच्यावर झालेला अन्याय त्यांनी साहित्यातून रेखाटले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शिक्षण घेत असलेले विद्यार्थीमध्ये एक प्रकारची जनजागृती करण्याचे कार्य हे साहित्यातून होत आहे. स्त्रियांचे शील, त्यांची प्रतिष्ठाव सन्मान, गरीब, श्रीमंत, जातीव्यवस्था, जातीभेद, विषमता ह्या सर्व प्रकारच्या प्रश्नांतून केले जाणारे शोषण व त्यातून निर्माण होणारा संघर्ष हे सगळे वास्तवचित्रण नागनाथ पाटीलयांच्या साहित्यातून प्रकट होतात. त्यामुळे अशाप्रकारचे साहित्यप्रवाह मला अत्यंत जवळचे व हद्‌यस्पर्शी वाटू लागले.

ग्रामीण भागातील बदलते जीवन वास्तव त्यावर समाजाचा, विज्ञान तंत्रज्ञानाचा औद्योगीकिरणाचा होणारा परिणाम बदलते सामाजिक संदर्भ ह्यात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झालेले दिसून येते. ह्या सर्व बदलत्या सामाजिक जीवनाचा नागनाथ पाटील यांच्या साहित्यामध्ये कशाप्रकारे केले आहे ह्या विषयी मला आस्था वाटू लागली. सध्याच्या बदलते तंत्रज्ञान आणि इंटरनेट, शिक्षण पध्दती औद्योगीकरण या सर्वाचा गंभीर परिणाम ग्रामीण भागातील सुशिक्षीत लोकांवर कच्यापध्दती झाला आणि त्यामुळे ते शहराकडे वळतात पण शहरात गेल्यानंतर त्यांच्या रोजगाराच्या वाढत जाणाऱ्या समस्या आणि त्यामुळे बदलते जीवनमान या विषयी सविस्तर चित्रण नागनाथ पाटील यांच्या समग्र साहित्यात उमटलेले दिसते.

नागनाथ पाटील यांच्या साहित्यावर जागतिकीकरणाचा कशा पध्दतीने परिणाम झाला त्यामुळे त्यांच्या साहित्यात आलेला वेगळेपणा शोधणे गरजेचे वाटते. म्हणून नागनाथ पाटील यांच्या साहित्याचा चिकीत्सक अभ्यास मी संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची गरज / विषय निवडीमागील कारणे

एकविसाव्या शतकात ग्रामीण साहित्यात अनेक प्रतिष्ठावंत साहित्यीकांनी आपले योगदान दिले. त्यात नागनाथ पाटील हे माझे आवडते साहित्यीक आहेत. म्हणून मराठवाड्यातील ग्रामीण लेखक म्हणून त्यांच्या साहित्याचा चिकीत्सक अभ्यास हा विषय मी संशोधनासाठी निवडला आहे. स्वातंत्र्यानंतरही जनसामान्यावर अनेक विषयांचा परिणाम झाला आहे. या अनुकूल व प्रतिकूल परिणामांचे पडसाद त्यांच्या साहित्यातून ही दिसून येतात.

एका लेखकाच्या साहित्यकृतीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने नागनाथ पाटील यांच्या साहित्याचा अभ्यास करणे गरजेचे वाटू लागले. म्हणून मी माझ्या संशोधनासाठी मराठवाड्यातील ग्रामीण लेखक नागनाथ पाटील एकविवेचक अभ्यास हा विषय निवडला आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

महाराष्ट्रातील विविध प्रदेशात अनेक लेखकांनी ग्रामीण साहित्याविषयी लेखन केले आहे. त्यातीलच मराठवाड्यात ह्या साहित्यीकांची संख्या असंख्य आहे. अशा अनेक साहित्यीकांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान या ग्रामीण साहित्यास दिली आहे.

एकंदरीत ग्रामीण साहित्याची व्याप्ती ही अतिशय मोठी आहे. प्रस्तुत शोधनिबंधात मराठवाड्यातील ग्रामीण लेखक नागनाथ पाटील यांच्या समग्र साहित्याचा विवेचक अभ्यास करण्याचा दृष्टीने जे लेखन झाले आहे. त्याचाच विस्ताराने अभ्यास करावयाचा आहे. मराठवाड्यातील एक ग्रामीण लेखक म्हणून नागनाथ पाटील यांच्या साहित्याचा अभ्यास करावयाचे असले तरी अनेक साहित्यीकांनी सुध्दा ग्रामीण साहित्य हा विषय हाताळलेला आहे. त्याचाही विचार संशोधनात केला जाणार आहे.

संशोधनपध्दती :

प्रस्तु विषयाचा अभ्यास करण्यासाठी चरित्रात्मक, वर्णनात्मक, ऐतिहासीक, समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय या संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. नागनाथ पाटील यांच्या साहित्यातून ग्रामीण समाजजीवनाचे जे काही संदर्भ आलेले आहेत ज्याचे विवेचन करताना आस्वादात्मक संशोधन पध्दतीचा देखील अवलंब केला जाईल.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले - १

१. मराठवाड्यातील ग्रामीण लेखकांची पूर्वापिढीका -

प्रस्तुत प्रबंधात मराठवाड्यातील ग्रामीण साहित्य या विषयावर संशोधन करण्यासाठी वापरण्यात येणारी संशोधन पध्दती, विषयाची व्याती व मर्यादा, विषयानुषंगाने झालेला संशोधनाचा आढावा तसेच मराठवाड्यातील ग्रामीण लेखकांची ग्रामीण साहित्य प्रकारात येणारी कथा, कादंबरी, कविता, संपादन

आणि ग्रामीण साहित्यातील पूर्वापिढीका इ. बाबींची चर्चा या प्रकरणात केली जाईल आणि या संदर्भानेच पुढील संशोधनाकडे वाटचाल केली जाईल.

प्रकरण २

नागनाथ पाटील : व्यक्ती आणि वांङ्‍मय

प्रस्तु प्रबंधात मराठवाड्यातील ग्रामीण लेखकाचा अभ्यास करत असताना त्यांचे व्यक्तिमत्व त्यांचा जीवनपरिचय, व्यक्तीमत्वाची जडणघडण त्यांच्या साहित्याचा परिचय, त्यांच्या साहित्याच्या प्रेरणा, तसेच त्यांच्या समग्र साहित्याचे स्वरुप व वैशिष्ट्ये आणि नागनाथ पाटील यांचे सामाजिक स्थान यांचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण - ३

नागनाथ पाटील यांच्या कथेचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात नागनाथ पाटील यांच्या कथा साहित्याच्या स्वरुपाच्या शोध घेतला जाईल. ग्रामीण साहित्यात लेखकांच्या कथेमध्ये असलेले वास्तव जीवन दर्शन कथेतील अशा विषयी समाजव्यवस्था त्यांच्या कथेतील व्यक्तीरेखा तसेच ग्रामीण जीवनाची पखड शेतकरी जीवनाचे चित्रण स्त्री चित्रण कथेची वैशिष्ट्ये त्यांच्या साहित्यात येणाऱ्या दुःखाची भावना आणि एकूणच त्यांच्या साहित्यात येणाऱ्या दुःखाची भावना आणि एकूणच त्यांच्या साहित्यातील असलेला वेगळेपणा यात सादर करता येईल. तसेच मराठवाड्यातील एकूणच कथनात्मक ग्रामीण साहित्यातून या प्रदेशातील हासमान लोकसंस्कृतीचे चित्र आले आहे का ? याचाही शोध घेतला जाईल.

प्रकरण - ४

नागनाथ पाटील यांच्या कादंबरीचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात कादंबरी वांङमय प्रकारात येणाऱ्या नागनाथ पाटील यांच्या कांदबऱ्यातून ग्रामीण समाज जीवनातील विद्राह, समाज व्यवस्था, व्यक्तिरेखा स्त्रीचित्रण, तसेच समाजातील वास्तव प्रश्न आणि त्यांच्या मांडलेल्या ग्रामीण जीवनमान जगणाऱ्या लोकांमधील अंधश्रध्दाळूपणा ह्या सर्वार्थाने या प्रकरणात चर्चा करण्यता येईल. माणूस व माणसाचे अस्तिव या घटकांचे कादंबरीतील चित्रण मानवाच्या जाणीवांचा वेध, मानवी जीवनातील विविध अनुभवामुळे कादंबऱ्यांना प्राप्त होणारे स्वरुप यांची चर्चा या प्रकरणात करता येईल.

प्रकरण पाचवे

नागनाथ पाटील यांचे कविता संग्रह आणि संपादन यांच्या अभ्यास

साहित्य हे भाषिक माध्यमात प्रकटते मराठवाड्यातील नागनाथ पाटील यांची कविता आणि संपादन हे दोन्ही ग्रामीण साहित्य प्रकार आहेत कवितेतील काव्यभाषा, प्रदेशचित्रण, राजकीय आणि सामाजिक जीवन स्त्रीविषयक चित्रणे, ग्रामीण जीवनातील संवेदना, कवितेतील वैशिष्ट्ये तसेच कवितेतून व्यक्त होणारे दुःख हे ग्रामीण माणसाचे वास्तव जीवन दर्शन घडवते अचानक कोसळलेल्या संकटाने

ग्रामीण जनजीवन कसे ढासळून जाते याची सविस्तर चर्चा या प्रकरणात केली जाईल.

प्रकरण सहावे : मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यात नागनाथ पाटील यांचे योगदान

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यात नागनाथ पाटील यांचे योगदान साहित्याची भूमिका, लोकजीवन, जीवनानुभव, सुशिक्षीत बेरोजगाराचे प्रश्न, भूक, दुःख संकट, दुष्काळ हा जीवनानुभवांचा साहित्यातून प्रकट होणारे अविष्कार या सर्वार्थाने त्यांच्या योगदानाची चर्चा या प्रकरणात केली जाईल.

प्रकरण सातवे : समग्र साहित्याचे वांङ्मयीन मूल्यमापन

नागनाथ पाटील यांच्या साहित्याचा आशय, निवेदन पध्दती, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, समाजनिष्ठा व जातीनिष्ठा ताणतणावाचे चित्रण, संवादकौशल्य, प्रतिमा व प्रतिके, सुशिक्षीत नोकरदार विविध वर्गातील स्त्रीजीवन साहित्याची भाषाशैली आणि एकूणच समग्र लेखनाची वैशिष्ट्ये यांची सविस्तर चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली जाईल.

निष्कर्षात्मक समारोप :

परिशिष्टे (मुलाखती, छायाचित्रे आणि संदर्भसूची) :

प्रबंधाच्या शेवटी मुलाखती, छायाचित्रे आणि संदर्भसूचीची मांडणी केली आहे. मराठवाड्यातील ग्रामीण लेखकाचा अभ्यास करताना विशेषतः नागनाथ पाटील यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना लेखकांच्या मुलाखती, छायाचित्रे आणि संशोधनासाठी सहाय्यक ठरलेल्या संदर्भग्रंथ सूची मांडण्यात आली आहे.

संदर्भसूची

नागनाथ पाटील यांचे कथा संग्रह

१. मॅपको

२. रानभूल

नागनाथ पाटील यांच्या कादंबऱ्या

१. हुतराणी

२. कोंडणातलं जीणं

३. लंबाडी

नागनाथ पाटील यांचे कवितासंग्रह

१. खोल डोहातल्या सावल्या

२. अर्वाचीन मराठी कविता (संपादन)

संदर्भग्रंथ सूची :

१. आनंद यादव - ग्रामीण साहित्य स्वरुप व समस्या मेहता प्रकाशन - पुणे - प्रथामावृत्ती - १९९७

२. रामचंद्र काळुंखे - ग्रामीण वांङ्मयाचा इतिहास प्रकाशन - प्रथमावृत्ती २०१६

३. प्रा. डॉ. शंकर राऊत - नागनाथ कोत्तापल्ले साहित्य व समीक्षा स्वरुप प्रकाशन - प्रथमावृत्ती २०१०

४. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले - ग्रामीण साहित्य स्वरुप व शोध स्वरुप प्रकाशन - तृतीय आवृत्ती २०१०

५. डॉ. मनोहर सुखाडे - ग्रामीण समाज आणि कथा साहित्य सुगम प्रकाशन - प्रथमावृत्ती २०१२

६. डॉ. वासुदेव मुलाटे - ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही स्वरुप प्रकाशन - प्रथमावृत्ती १९९६

७. थोरात हरिशचंद्र - कादंबरीविषयी - पद्मगंधा प्रकाशन पुणे जून २००६

८. कुलकर्णी द.भि. कादंबरी स्वरुप व समीक्षा पद्मगंधा प्रकाशन पुणे मार्च २०१०

९. ठाकूर रवींद्र - मराठी ग्रामीण कादंबरी

१०. नलगे चंद्रकुमार (संपा) ग्रामीण वांङ्मयाचा इतिहास

नागनाथ पाटील यांची ग्रंथ संपदा

नागनाथ पाटील यांचे कथासंग्रह

१.मॉपको

२. रानभूल

३.तिटविचे पाय (अगामी)

नागनाथ पाटील यांच्या कादंबऱ्या

१. हुतराणी

२. कोंढाणातलं जीण

३. लंबाडी

नागनाथ पाटील यांचे कवितासंग्रह

१.खोल डोहातल्या सावल्या

२. अर्वाचीन मराठी कविता (संपादन)

३. सावली हरवलेली झाड

संदर्भ ग्रंथ सूची:-

१. आनंद यादव- ग्रामीण साहित्य स्वरूप व समस्या मेहता प्रकाशन पुणे प प्रथमावृत्ती १९९७

२. रामचंद्र साळुंके- ग्रामीण वांग्मयाचा इतिहास प्रकाशन- प्रथमावृत्ती २०१०

३. प्रा. डॉ.शंकर राऊत -नागनाथ कोत्तापल्ले साहित्य व समीक्षा स्वरूप प्रकाशन -प्रथमावृत्ती २०१०

४.डॉक्टर नागनाथ कोत्तापल्ले ग्रामीण साहित्य स्वरूप व स्वरूप प्रकाशन -तृतीय आवृत्ती २०१०

५.डॉक्टर मनोहर सुरवाडे ग्रामीण समाज आणि कथासाहित्य शुभम प्रकाश न -प्रथमावृत्ती २०१२

६.डॉ. वासुदेव मुलाटे- ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही स्वरूप प्रकाशन -प्रथमावृत्ती १९९६

७.थोरात हरिश्चंद्र- कादंबरी विषयी पद्मगंधा प्रकाशन पुणे जुन २००६

८. कुलकर्णी दळवी कादंबरी स्वरूप व समीक्षा पद्मगंधा प्रकाशन पुणे मार्च २०१०

९. ठाकूर रवींद्र - मराठी ग्रामीण कादंबरी

१०. नलगे चंद्रकुमार (संपा) वांग्मयाचा इतिहास

मार्ग दर्शक

डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे
प्रमुख मराठी विभाग
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर
जि. नांदेड.
दूरभाष ९४२०८१३१८५

संशोधक

बंडले सुरेखा तुळशीराम
एम. ए. एम. एड. नेट (मराठी)
दूरभाष ७७०९६६६३३७